# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

द्वारा आयोजित

# विदर्भ मराठी समाजशास्त्र परिषदेचे ६ वे राज्यस्तरीय अधिवेशन

- विषय -

## ग्रामीण आदिवासी क्षेत्रातील सामाजिक संशोधनाची आव्हाने

दिनांक २२, २३ फेब्रुवारी, २०१६

स्थळ :- गोंडवाना विद्यापीठ सभागृह, गडचिरोली

श्रीमान/श्रीमती ____________________

____________________

____________________ सा.न.वि.वि

वरील सर्व कार्यक्रमास आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.

## - कार्यक्रम -

**दिनांक २२ फेब्रुवारी, २०१६**

**सकाळी ९.०० ते १०.०० नोंदणी, चहा व नाश्ता**

# उद्घाटन समारंभ

**सकाळी १०.३० वाजता**

- अध्यक्ष -

## डॉ. एन. व्ही. कल्याणकर

**कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

- उद्घाटक -

## डॉ. स्मिता अवसार

**समाजशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद**

- प्रमुख पाहुणे -

**डॉ. दिवाकर राजपुत,** समाजशास्त्र विभाग प्रमुख, सागर विद्यापीठ, सागर

**डॉ. बी. के. स्वाई,** समाजशास्त्र विभाग प्रमुख, रा. तु. म. ना. विद्यापीठ, नागपूर

## तांत्रिक सत्र पहिले

**दुपारी २.३० वाजता**

विषय - ग्रामीण आदिवासी क्षेत्रातील सामाजिक आर्थिक विकास व संशोधन

- अध्यक्ष -

**डॉ. संपत काळे,**

टाटा समाज विज्ञान संस्था, तुळजापूर

- प्रमुख वक्ते -

**मा. हिरामणजी वरखडे,**

माजी आमदार, महाराष्ट्र शासन तथा आदिवासी सेवक

## तांत्रिक सत्र दुसरे

**दिनांक २३ फेब्रुवारी, २०१६ सकाळी ९.३० वाजता**

विषय - आदिवासी संस्कृतीचे उच्चाटन, वंचितांसाठी केल्या जाणाऱ्या वल्गना आणि सामाजिक संशोधन.

- अध्यक्ष -

**डॉ.श्रीकांत गायकवाड** समाजशास्त्र विभाग प्रमुख, मा. वश्वेश्वर महाविद्यालय, लातुर

- प्रमुख वक्ते -

**मा.श्री. देवाजी तोफा** प्रसिध्द सामाजिक कार्यकर्ता, लेखामेंढा, गडचिरोली

(आमच्या गावात आम्हीच सरकार)

## तांत्रिक सत्र तिसरे दुपारी १२.०० वाजता

विषय - शेती सुधारणा विषयक डॉ. आंबेडकरांचे विचार

- अध्यक्ष -

**डॉ. किशोर राऊत**

समाजशास्त्र विभाग, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

## समारोपीय कार्यक्रम दुपारी ३.०० वाजता

- अध्यक्ष -

**डॉ. विनायक ईरपाते,**

कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

- प्रमुख पाहुणे -

**डॉ.नंदाजी सातपुते**

अधिष्ठाता समाजविज्ञान शाखा, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

दि. २४/०२/२०१६ ला इच्छुकांसाठी सहलीचे आयोजन केले आहे.

मार्कंडा देव, चपराळा, अहेरी, वनवैभव आलापल्ली, लोकबिरादरी प्रकल्प हेमलकसा, त्रिवेणी संगम भामरागड, लेखामेढा, सर्च शोधग्राम या स्थळांना भेटीचे प्रयोजन आहे. आवश्यक ती फी भरुन सहलीचा आनंद घेता येईल

- विनित -

**डॉ. विनायक ईरपाते**
कुलसचिव,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
मो. ९४०४५२९९३०

**डॉ. श्रीराम रोकडे**
संचालक,
बी.सी.यु.डी.,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**डॉ. बी.एम.कऱ्हाडे**
अध्यक्ष,
विदर्भ मराठी समाजशास्त्र परिषद
मो. ९४२२७३५०००

## गोंडवाना विद्यापीठ

ग्रामीण व आदिवासी बहूल भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी महाराष्ट्र शासनाने २७ सप्टेंबर २०११ रोजी गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीची स्थापना केली, २ ऑक्टो. २०११ ला राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीपासून विद्यापीठाचे प्रत्यक्ष कामकाज सुरू झाले. सद्यस्थितीत २३७ संलग्नित महाविद्यालये व ५ पदव्युत्तर शैक्षणिक विभागातून विद्यार्थ्यांना दर्जेदार उच्च शिक्षण मिळावे या करीता विद्यापीठ प्रयत्नशील आहे.

## गडचिरोली जिल्हा

गडचिरोली जिल्हा हा भौगोलिक दृष्ट्या महाराष्ट्राच्या आग्नेय दिशेला असून त्याच्या उत्तरेस भंडारा जिल्हा, पुर्वेस छत्तीसगड राज्यातील राजनांदगाव व बस्तर जिल्हा आहे दक्षिणेस आंध्र प्रदेशातील करीमनगर, अदिलाबाद जिल्हे व पश्चिमेस चंद्रपूर जिल्हा आहे. वैनगंगा ही जिल्हयाची मुख्य नदी असून ती जिल्हयाच्या पश्चिम दिशेकडून वाहते तिच जिल्हयाची सीमारेषा आहे. या शिवाय, दिना, गाढवी, खोब्रागडी, कठाणी, पौर, निब्रा, कोठरी, पर्लकोटा, पामलगौतम, बांडीया हया महत्त्वाच्या उपनद्या वाहतात.

गडचिरोली जिल्हा आकारमानाने महाराष्ट्रात चौथ्या क्रमांकावर असून महाराष्ट्र राज्याच्या एकुण क्षेत्रफळापैकी (३०७७१३ चौ.कि.मी.) ५.० टक्के क्षेत्र (१५४३४ चौ.कि.मी.) जिल्हयाने व्यापलेले असून ७७.४१ टक्के क्षेत्र वनांनी आच्छादीत आहे. गडअहेरी, भामरागड, टिपागड, पळसगड व सुरजागड या प्रमुख डोंगरांनी हे जंगल व्याप्त क्षेत्र व्यापलेले असून या जिल्हयातील सर्वात उंच शिखर गडलगट्टा पहाडामध्ये (९६७ मी.) आहे. टिपागड रांगांची समुद्र सपाटीपासून उंची ६०९ मी. आहे.

हा जिल्हा गोंडवन विभागात येत असून गोंड, माडीया, हलबा, परधान, हलबी कवर इत्यादी आदिवासी जमाती आढळतात. 'गोंड' ही या जिल्हयाची प्रमुख अनार्य जमाती असून द्रविडीयन वंशगटातील मानली जाते.

## संशोधन कार्य

संशोधनकर्ता संशोधनाचा विषय वा एखादे क्षेत्र का निवडतो हे संशोधकाच्या रूचीच्या अंगानेच समजू शकते. त्या विषयाबाबत संशोधनकर्त्यास शास्त्रीय उत्सुकता असते. तसे असल्याशिवाय आपले व्यक्तिमत्व त्यात उमटणार नाही. कोणत्याही प्रादेशिक समाजाचा अभ्यास करतेवळी अभ्यासकाला त्या समाजाची परंपरा, संस्कृती, मूल्ये, रितीरीवाज इत्यादीचे संपूर्ण आकलन करून घ्यावे लागते. समाजाचा बहिर्गत दृष्ट्या अभ्यास करण्याऐवजी अंतर्गत दृष्ट्या अभ्यास करणे हे समाजशास्त्राच्या

अभ्यासाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक असते. परप्रांतीय व्यक्तीपेक्षा स्वप्रांतीय व्यक्तीला आपल्या समाजाची आंतरीक ओळख जितक्या जवळीकतेने व अंतरंगाने होते तितकी परप्रांतीय व्यक्तीला होत नाही.

## आदिवासी जमाती

अलीकडच्या काळात आदिवासी हा शब्द विशिष्ट भाषा बोलणाऱ्या, विशिष्ट जीवन पध्दतींनी व परंपरांनी नटलेल्या आणि शेकडो वर्षे जंगल-पहाडात जीवन जगत असताना आपली धार्मिक व सांस्कृतिक मूल्ये जोपासणाऱ्या मानवसमूहाची ओळख करून देण्यासाठी वापरला जातो आणि फार मोठया प्रमाणावर त्यांच्या सामाजिक दु:खावर, उद्ध्वस्त प्रपंचावर हळहळ व्यक्त केली जाते. कधी अर्धनग्न राहून, कधी लंगोटी नेसून शिकार करण्यासाठी रानोमाळ वन-वन भटकल्यामुळे त्यांना 'वनवासी' किंवा 'वन्य जमाती' म्हणून ओळखण्याचा प्रघात पडला आहे. कोणी त्यांना उपहासाने अरण्यक किंवा लंगोटे म्हणून संबोंधतात. कोणी त्यांना सहानुभूतीने 'धरतीची लेकरे' म्हणतात. गिरिकंदरात शेकडो वर्षे वास्तव्य करीत असल्यामुळे कोणी त्यांना 'गिरिजन' म्हणणेही योग्य समजतात. 'आदिपुत्र' किंवा 'वनपुत्र' हयाही नावाने ओळखले जाते. जंगलाचे 'अनभिषिक्त राजे' म्हणूनही त्यांचा उल्लेख केला जातो. शासानाच्या दप्तरात 'अनुसूचित जमाती' असा त्यांचा उल्लेख आहे.

## चर्चेचा विषय

देशाच्या सामाजिक, आर्थिक विकासाची घोडदौड सुरू असताना व भारताला जगाची महासत्ता बनविण्याचे स्वप्न पहात असताना याच देशाचा एक भाग 'दुर्गम ग्रामीण आदिवासी समाज' विकासापासून शेकडो मैल दूर फेकला जात आहे. शासन स्तरावरून विविध प्रयत्न होत असूनही अपेक्षित यश पदरात पडत नाही याचे खरे कारण मुलभूत संशोधनाचा अभाव होय. संशोधक म्हणून आम्हालाही आमच्या जबाबदारी पासून दूर राहता येणार नाही आमच्या समाजाचे शल्य आम्हालाच शोधून समाजासमोर मांडावे लागेल व त्यावर उपचारही आम्हालाच सुचवावे लागेल. बाहेरच्या व्यक्तीनी केलेल्या संशोधन कार्यापेक्षा स्थानिक संशोधकांकडून झालेले संशोधन व त्यांनी सुचविलेले उपाय अनेक पटीने सरस ठरतील. हेच महत्त्वपूर्ण कार्य आपल्या स्तरावरून व्हावे त्यावर मंथन व कार्य घडावे याचसाठी प्रस्तुत विषय : ''ग्रामीण आदिवासी क्षेत्रातील संशोधनाची आव्हाने'' शोधनिबंध व चर्चेसाठी ठेवण्यात आला आहे.

१. दुर्गम भागातील सामाजिक आर्थिक विकास आणि संशोधन.

२. वंचितांसाठी केल्या जाणाऱ्या वल्गना आणि सामाजिक संशोधन.

३. आदिवासी संस्कृतीचे उच्चाटन आणि सामाजिक संशोधन.

४. दुर्गम क्षेत्रातील पारंपारिक वैद्यकीय सेवा आणि संशोधन.

५. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शेती विकासाचा दृष्टीकोन.

वरीलपैकी कोणत्याही एका विषयावर शोध निबंध लिहून आयोजकांकडे दिनांक १६ जानेवारी २०१६ पर्यंत पाठविण्यात यावा. ISBN नंबर असलेल्या संशोधन पत्रिकेत त्याचा समावेश करण्यात येईल.

**शोध निबंधाबाबत सुचना:-**

१. आपला शोध निबंध मराठीमध्ये कृतीदेव १०, फॉन्टसाईज १४, मायक्रोसॉट वर्डमध्ये व इंग्रजी निबंध Time New Roman Size-12 Microsoft Word मध्ये असावा.

२. शोध निबंधाची शब्द मर्यादा १५०० ते २००० असावी.

३. आपला शोध निबंध दि. १७ जानेवारी २०१६ पर्यंत register.gondwanauniversity@gmail.com या इमेलवर पाठविण्यात यावा.

४. त्याची एक ममुद्रित प्रत डॉ. बी.एम. कऱ्हाडे, अध्यक्ष, विदर्भ मराठी समाजशास्त्र परिषद, आशादीप, लुम्बिनी नगर, ब्रम्हपूरी जि. चंद्रपूर ४४१२०६ या पत्यावर पाठविण्यात यावा.

**प्रतिनिधी शुल्क :-**

| | |
|---|---|
| १. प्राध्यापक निबंधासह | - १,०००/- |
| २. प्राध्यापक निबंधाशिवाय | - ६००/- |
| ३. विद्यार्थी निबंधाशिवाय | - ३००/- |

**सल्लागार समिती :-**

प्राचार्य डॉ. डी.जी. म्हशाखेत्री, चामोर्शी, प्राचार्य डॉ. हेमराज लाड, भामरागड, प्रा. एम.व्ही. बोरकर, अहेरी, प्रा. आर.बी. मेश्राम, ब्रम्हपूरी, प्रा. बी.जी. दमकोंडावार, ब्रम्हपूरी, डॉ. ए.एन. सालोटकर, डॉ. वाय. के. खोटेले, प्रा. डी.व्ही. घोडेस्वार, प्रा. एम.बी. वासेकर, लाखांदूर, प्रा. एम.आर. जांभूळकर, चंद्रपूर, प्रा. डॉ. व्ही.जी. चव्हाण, वडसा, प्रा. डॉ. वाघ, धानोरा, प्रा. डॉ. रंजना लाड, वरोरा, प्रा. डॉ. माया मसराम, गडचांदूर, प्रा. बारसागडे, चंद्रपूर, डॉ. ए.पी. जाधव, मांडळ, प्रा. संजय चव्हाण, तळोधी, प्रा. डॉ. पांडे, आष्टी, प्रा. डॉ. श्री. एन. सहारे, गडचिरोली, डॉ. पंडित फुलझेले, सावली, डॉ. संजय कुंभारे, तळोधी.